सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९० | रविवार, दि. १२ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४२७०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३१२०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १०८७०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २२८०/- |

भाव प्रती १० ग्रॅम






प्रणाली सूर्यवंशी
अमळनेर



सौ. वैशाली पहाडे
अमळनेर



श्री. मुकेश बिऱ्हाडे
अमळनेर



श्री. नितीन पाटील
अमळनेर

# साथीच्या आजारांवर नियंत्रणासाठी पालिकेची धडक मोहीम

## नाले स्वच्छतेसह ठिकठिकाच्या सकल भागांतील डबक्यांत टाकले अॅबेट, ऑईल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात डास, माशा, कीटकांपासून होणाऱ्या आजारांना प्रतिबंध घालण्यासाठी पालिकेने डेंग्यू, हिवताप निर्मूलन मोहीम हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने डबके, नाले स्वच्छ करून त्यात अॅबेट, ऑईल टाकले जात आहे.

पावसाळा सुरू झाल्यानंतर ठिकठिकाणी डबके साचतात, नाले भरतात आणि पाण्यामध्ये डास, कीटक यांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया, हिवताप यासारख्या साथरोगांचा फैलाव सुरू होतो. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, सर्व नगरसेवक व नगरसेविका, मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात डेंगू, हिवताप निर्मूलनासाठी गप्पी मासे पैदास केंद्रांवरून गप्पी मासे पकडून विविध सकल भागांमध्ये साचलेल्या डबक्यांमध्ये ते सोडण्यात आले, तसेच अॅबेट, ऑईल सोडण्याची मोहीम राबविण्यात आली. सदर मोहीम यशस्वितेसाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गोसावी, पालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी. डॉ. विलास महाजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. आर. शेलकर, आरोग्य पर्यवेक्षक प्रशांत फुगे, आरोग्य निरीक्षक किशोर माळी, अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व आरोग्य सेवक, सेविका, आशावर्कर यांनी मोहीम यशस्वीरित्या राबविली. मोहिमेत एकूण १४ पथके एकाच दिवशी, ४३ आशा वर्कर, सर्व आरोग्य सेवक, सेविका यांनी डास निर्मूलन मोहिमेत सहभाग घेतला.

सदर मोहीम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आली. प्रभाग क्र. ८ मध्ये नगरसेविका सौ. अपूर्वाताई पाटील यांनी स्वतः आरोग्य कर्मचाऱ्यांबरोबर फिरून प्रभागातील डबक्यांत ऑईल सोडले. या उपक्रमातून डासांची उत्पत्ती थांबवून आजारांना प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न आहे.






अमळनेर : शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साथीच्या आजारांवर नियंत्रणासाठी पालिकेतर्फे धडक मोहीम राबविताना वैद्यकीय अधिकाऱ्यांसह आरोग्य अधिकारी व कर्मचारी आणि प्रभागाचे नगरसेवक सचिन पाटील, सौ. अपूर्वाताई पाटील.

# अमळनेर तालुक्यात ९ गावांना आजही टँकरचाच आधार

## जिल्हा प्रशासनातर्फे ३१ जुलैपर्यंत उपाययोजना कायम राहणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : तालुक्यातील पाणीटंचाई निवारणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. पाच गावांतील टँकर बंद करण्यात आले असले, तरी आजही ९ गावांमध्ये टँकरद्वारेच पाणीपुरवठा केला जात आहे.

अमळनेर तालुक्यात ९ जुलै २०२६ पर्यंत सरासरी १८५.६ मि.मी. पाऊस पडला आहे. अमळनेर मंडळात १०६.७ मि.मी. , शिरूड मंडळात १२४ मि.मी., पातोंडा मंडळात ९५.७ मि.मी., मारवड मंडळात १०८ मि.मी. , नगाव मंडळात १७५.२ मि.मी. , अमळगाव मंडळात १०६.५ मि.मी., भरवस मंडळात ९०.७ मि.मी., वावडे मंडळात ११९.३ मि.मी. पाऊस पडला आहे. उन्हाळ्यात १४ गावांना टँकर, तर २१ गावांना विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या. अद्यापही काही गावांच्या पाण्याची पातळी वाढली नाही. त्यामुळे टंचाई जाणवत आहे. अपुरा पाऊस, धरणे व तलावांतील अत्यल्प जलसाठा तसेच संभाव्य कमी पर्जन्यमानाचा अंदाज लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत टँकर सुविधा पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार अमळनेर तालुक्यात गळवाडे बुद्रुक, गळवाडे खुर्द, चोपडाई, कोंढावळ आणि मंगरूळ या गावांतील पाणीटंचाई दूर झाल्याने तेथील टंचाई उपाययोजना बंद करण्यात आल्या आहेत. उर्वरित जानवे, तरवाडे, उदयनगर, वासरे, खेडी बुद्रुक, शिरसाळे बुद्रुक, शिरसाळे खुर्द, खर्दे आटाळे या टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यकतेनुसार टँकर, विहीर अधिग्रहण व इतर किमान खर्चाच्या उपाययोजना सुरू ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी घुगे यांनी दिले आहेत. स्थानिक परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन नागरिकांना अखंड पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी महसूल, जिल्हा परिषद व भूजल सर्वेक्षण विभागाने समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# मोकाट फिरणाऱ्या गुरांविरोधात अमळनेर पालिकेचा दणका

## रस्त्यावर दिसल्यास थेट गोशाळेत; मालकांना दंड ठोठावला जाणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात अलीकडे मोकाट फिरणाऱ्या गुरांचे प्रमाण वाढल्याने पालिकेने यासंदर्भात संबंधित गुरांच्या मालकांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरात मोकाट गुरे जागोजागी फिरत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना त्रास होत होता. रस्त्याच्या मधोमध झुंडीने गुरे बसल्याने वाहतुकीला अडथळा किंवा किरकोळ अपघात होत होते. भाजी बाजारात नागरिकांच्या मोटारसायकलला लावलेल्या पिशव्यांमधील भाजीपाला खाणे, नागरिकांच्या कम्पाऊंडमध्ये शिरून झाडे खाणे, बाहेर वाळत टाकलेले धान्य, खाद्यपदार्थ खाऊन जाणे आदी प्रकारांमुळे नागरिक त्रस्त झाले होते.

मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी मोकाट फिरणाऱ्या गुरांवर कारवाईचे आदेश अतिक्रमण विभागाला दिले असून, अतिक्रमण विभागप्रमुख राधेश्याम अग्रवाल, जितेंद्र चावरिया, सुनील संगेले, विशाल सपकाळे, चंदू बिऱ्हाडे, राज रामराजे, दर्शन बिऱ्हाडे, अविनाश बिऱ्हाडे या कर्मचाऱ्यांनी मोकाट गुरे वाहनात भरून गोशाळेत जमा करणे सुरू केले आहे. मोकाट गुरांना गोशाळेत जमा केल्यानंतर तेथे त्यांना चारा-पाणी केले जाईल. मात्र, संबंधित गुरांच्या मालकांना गुरे परत हवी असल्यास जितके दिवस गुरांचे पालन पोषण केले जाईल तितक्या दिवसांचा खर्च गोशाळेला दिला जाईल आणि नगरपालिकेचा वेगळा पाचशे रुपये दंड आकारला जाईल. गुरे मालकांनी आपापली गुरे घरी अथवा गोठ्यात बांधून ठेवावीत, रस्त्यावर फिरताना आढळल्यास ती जमा केली जातील. विनाकारण भुर्दंड भरण्यापेक्षा सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही म्हणून शिस्तीचे पालन करावे, असे मुख्याधिकारी शिंदे यांनी कळविले आहे.



अमळनेर : मोकाट फिरणाऱ्या गुरांविरोधात कारवाई करताना पालिकेचे अधिकारी, कर्मचारी.

# सेवानिवृत्तीनंतर बोगस शिक्षक नियुक्तीचा आरोप

## माजी मुख्याध्यापक पाटील यांच्याकडून 'एसआयटी' चौकशीची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुख्याध्यापक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या काळातील शिक्षकाची बनावट नियुक्तीची चौकशी व्हावी, अशी मागणी तत्कालीन मुख्याध्यापकाने शिक्षण आयुक्त, शिक्षण उपसंचालक व 'एसआयटी'कडे केली आहे.

पारोळा तालुक्यातील रत्नापिंप्री येथील यशवंत किसान माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक एम. एन. पाटील यांनी तक्रारीत म्हटले आहे, की मी १ जानेवारी २०२३ रोजी मुख्याध्यापक होतो. ३१ मे रोजी सेवानिवृत्त झालो. या काळात कोणतेही कार्यकारी मंडळ कार्यरत नव्हते. धर्मदाय आयुक्तांकडे संस्था कार्यकारिणीचा वाद सुरू होता. तरीही माझ्या सेवानिवृत्तीनंतर कार्यकाळात बनावट कार्यकारिणी दाखवून धर्मेंद्र राजेंद्र शिंपी या शिक्षकाची शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती दाखविली. त्यासाठी बनावट शालार्थ आयडी तयार करण्यात येऊन माझी आणि शासनाची फसवणूक करण्यात आली. माझ्या सेवानिवृत्तीनंतर एक वर्ष व्ही. बी. भदाणे मुख्याध्यापक होते. त्यांच्या कार्यकाळात देखील धर्मेंद्र शिंपी नोकरीस नव्हते. मात्र मागची तारीख टाकून त्यांची बोगस नियुक्ती करण्यात आली. तरीही शिक्षण उपसंचालकांच्या अधिकृत शालार्थ यादीत त्यांचे नाव आहे. हे बनावट व खोटे असून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

**युजर्सच्या तीव्र संतापानंतर 'मेटा'चा मोठा निर्णय**
-पान २

# स्कॉलरशिप परीक्षेत मयूर पाटील राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत

## अमळनेरचे साने गुरुजी माध्यमिक विद्यालय जिल्हास्तरावर अव्वल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयाचे इयत्ता आठवीतील तब्बल १२ विद्यार्थ्यांनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (स्कॉलरशिप) उल्लेखनीय ऐतिहासिक यश संपादन करत गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. यापूर्वी देखील एन.एम.एम.एस. परीक्षेत १६ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत स्थान मिळविले होते. स्कॉलरशिपसारख्या प्रतिष्ठेच्या शिष्यवृत्तीसाठी १२ विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीसाठी निवड झाली असल्याने संस्था, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गुणवत्ता यादीत मयूर गजानन पाटील हा विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत झळकला आहे. तसेच जिल्हास्तरावर तो प्रथम आलेला आहे. तर मोहक साळुंखे, विराज पाटील, तपन पाटील, पार्थ पाटील, जयेश चौधरी, मोहित पाटील, हिमांशू मराठे, पियुष शिंदे, युगंधर पाटील, शिवम पाटील, सागर साळुंखे या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत आपले स्थान पक्के केले आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीसाठी समावेश आहे. शासनाच्या नियमानुसार या सर्व विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्ती चा लाभ मिळणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक सुनील पाटील व सर्व शिक्षकांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या या दैदीप्यमान यशाबद्दल शाळेने गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव संदीप घोरपडे तर प्रमुख पाहुणे संस्थेचे उपाध्यक्ष गुणवंतराव पाटील व प्राचार्य एस. जे. शेख उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांमधून तपन पाटील व मयूर पाटील यांनी, तर पालक प्रतिनिधी म्हणून गजानन पाटील यांनी संचालक प्रतिनिधी म्हणून प्राचार्य शेख यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे मुख्याध्यापक प्रतिनिधी सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. डी. ए. धनगर यांनी सूत्रसंचालन केले. देवेंद्र पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




अमळनेर : पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (स्कॉलरशिप) उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे सचिव संदीप घोरपडे, उपाध्यक्ष गुणवंतराव पाटील, प्राचार्य एस. जे. शेख यांच्यासह शिक्षक-शिक्षिका.

## संपादकीय

# राजकीय दहशतीचे अतिरेकी तंत्र

आपल्या देशामध्ये लोकशाहीने दिलेल्या स्वातंत्र्याचा अनेक ठिकाणी अतिरेकी वापर होतो आणि हे अनेक घटनांमधून वारंवार सिद्ध झालेले आहे. आमचे तर नेहमी असे म्हणणे आहे, की या स्वातंत्र्याचा सर्वांत अतिरेकी वापर राजकारणी लोक करीत असतात. त्यांना मिळणारी सत्ता किंवा राजकारणात वावरत असताना अनेक प्रकारच्या अधिकाराचा ते मनमानी वापर करतात. त्यातून स्वतःचा राजकीय दबदबा निर्माण करून राजकीय दहशत तयार करण्याचाही त्यांचा हेतू असतो. अशाच प्रकारची घटना डोंबिवलीच्या शास्त्रीनगर इथल्या सरकारी रुग्णालयात घडली. तेथील डॉक्टर आणि काही पारिचारिकांना म्हणजेच नर्सेसला मारहाण करण्याचा तेथील नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी केलेला प्रकार याच राजकीय दहशतीचा भाग ठरतो. यासंदर्भात पोलीस कारवाई जरी झाली असली तरीसुद्धा मारहाण करतानाची चित्रफीत बघितल्यानंतर कायदा आणि सुव्यवस्था राजकारण्यांकडून किती सहजपणे धाब्यावर बसवली जाते याचा तो ताजा नमुना म्हणावा लागतो. कल्याण मतदारसंघाचे संसदेमध्ये प्रतिनिधित्व करणारे हेसुद्धा एक डॉक्टरच आहेत. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात त्यांच्याच पक्षाच्या नगरसेवक आणि त्याच्या तथाकथित कार्यकर्त्यांनी डॉक्टरना अतिशय अमानुष पद्धतीने केलेली मारहाण आणि त्यातही महिला चालकांवर हात उचलण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत निषेधार्ह ठरतो. डॉक्टर खासदारांच्या मतदारसंघामध्ये तेथील डॉक्टरही सुरक्षित नाहीत, असेही म्हणण्याची वेळ येते. हा प्रकार केवळ एका विशिष्ट पक्षाच्याबाबतीत घडला आहे असे नाही. याला कोणताही राजकीय पक्ष अपवाद ठरू शकत नाही. प्रत्येक पक्षाकडून अशीच दादागिरी सुरू असते. त्या-त्या ठिकाणचे चिल्लर स्थानिक कार्यकर्तेसुद्धा इतक्या विचित्र पद्धतीने अशी दबंगगिरी करीत असतात. या सगळ्या दादागिरीचे बळी प्रामुख्याने त्या-त्या ठिकाणचे सरकारी कर्मचारीच मोठ्या प्रमाणावर ठरतात. मग कधी टोल नाक्यावरचे कर्मचारी असतील. कधी रुग्णालयातले डॉक्टर्स असतील. कधी सरकारी कार्यालयातील कर्मचारी किंवा अधिकारी असतील. त्यांना मारहाण करण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडून येतात.

सरकारी कर्मचाऱ्यांकडून चुका होतही असतील. पण या चुकांविषयी दाद मागण्याची त्यांच्या चुकांना दुरुस्त करण्याची आपल्याकडे कायद्यानेच काही व्यवस्था निर्माण करून दिलेली आहे. पण त्या कायद्याला बाजूला ठेवून कायदा हातात घ्यायचा आणि आपल्या मनमानी पद्धतीने दहशत निर्माण करण्याचे प्रकार होत असतात. बऱ्याच वेळेला तर थेट सरकारी कार्यालयात घुसून तेथील फर्निचरची तोडमोड करणे, खुर्च्या अंगावर फेकणे, तेथील कर्मचाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणे हे प्रकारही केले जातात. ज्या ठिकाणी अन्याय झालेला आहे त्याचा जाब विचारण्याचा अधिकार आपल्याला घटनेने किंवा कायद्याने दिलेला आहे. पण जाब विचारतानासुद्धा त्या ठिकाणी हिंसाचार करण्याची कोणालाही कायद्याने अनुमती दिलेली नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे, की कायदा नियम हे फक्त सामान्य माणसासाठी आहेत आणि राजकारण्यांसाठी मात्र कायदे धाब्यावर बसवण्यासाठीच तयार झालेले आहेत. अशी आज परिस्थिती पाहायला मिळते. आता या नगरसेवकाविरुद्ध कारवाई होईल. त्याला अटक होण्याची शक्यता व्यक्त झाली होती. माफी मागून तो स्वतःची सुटका करून घेण्यासाठी प्रयत्न करेल. परंतु एवढ्यावर हे प्रकरण थांबून चालणार नाही. अशा राजकीय दहशतीच्या प्रकारांना आळा घालायचा असेल तर या गैरकृत्यांना योग्य त्या शिक्षाही झाल्या पाहिजेत. यातील कोणताही दोषी मोकळा सुटता कामा नये. जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत हे प्रकार थांबण्याची शक्यता नाही. बऱ्याच वेळेला असे दहशत माजवणारे राजकारणी आपला कार्यभाग साधून घेतात. दहशत निर्माण करण्याचा त्यांचा उद्देशही साधला जातो. आणि नंतर जामिनावर सुटताच त्याबद्दलचे खटले कालांतराने काढून टाकण्याचाही प्रकार घडतो. म्हणूनच या प्रकरणात अधिकाधिक कडक शिक्षा होणे तितकेच गरजेचे आहे.

विशेषतः रुग्णालयातील डॉक्टरांबाबत हे प्रकार वारंवार पाहायला मिळतात. त्यातही ही सरकारी किंवा महापालिकेची रुग्णालये असतात. त्या ठिकाणी सेवेवर असणाऱ्या डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांबाबत असे हल्ले होण्याच्या घटना घडतात. अनेक ठिकाणी रुग्णाचे नातेवाईक मागचा पुढचा विचार न करता जो काही प्रकार झाला असेल त्याला डॉक्टर दोषी आहे, असे समजून संतापाच्या भरात संबंधित डॉक्टरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. डॉक्टर दोषी असेल तर त्याच्या विरुद्धसुद्धा तक्रार करण्याच्या किंवा दाद मागण्याच्या पद्धती उपलब्ध आहेत. यातून सरळ मारहाण करण्याचे तंत्र अवलंबले जाते. यात सरकारी सेवा जिथे जिथे मिळतात तेथेसुद्धा दहशत निर्माण करण्याचाच तो एक भाग ठरतो. डॉक्टरांवर हल्ले होण्याचे प्रकार सातत्याने वाढत गेल्यानंतर त्यासंदर्भात स्वतंत्र नियम केले गेले आहेत. प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात डॉक्टरांना मारहाण झाली तर त्याबद्दल काय शिक्षा होऊ शकते. याची माहिती देणारे फलक लावलेले असतात. ज्यावेळेला डॉक्टर उपचार करतात त्यावेळेला ते आपल्याला देवदूतासारखे वाटतात. परंतु त्यांच्याबाबतीत गैरसमज आणि गैरव्यवस्था झाली तर थेट मारहाण करण्यापर्यंत मजल जाते. निदान वैद्यकीय क्षेत्रामध्ये डॉक्टरांनी जसे जबाबदारीने वागण्याची अपेक्षा ठेवली जाते. तशीच सामाजिक सभ्यता म्हणूनसुद्धा ती प्रत्येकाची जबाबदारी ठरते. डोंबिवलीमधील प्रकाराची दखल गांभीर्याने घेतली पाहिजे. स्वाभाविकपणे या घटनेला राजकीय रंग दिला जाईल. नगरसेवकपद रद्द करण्याचीही मागणी होईल. परंतु मागणी करणारे राजकीय लोकच असतात. आणि त्यांच्याही कार्यकर्त्यांकडून अशा प्रकारची दांडगाई होत असते. प्रत्येक राजकीय पक्षाने याबाबतीत आत्मपरीक्षण केले पाहिजे. अगदी आपापल्या विभागात किंवा मतदारसंघांमध्येसुद्धा लोकप्रतिनिधींच्या सेवाकायपिक्षा त्यांच्या या राजकीय दबंगगिरीची चर्चा असे हे विसरून चालणार नाही.

# युजर्सच्या तीव्र संतापानंतर 'मेटा'चा मोठा निर्णय

## इन्स्टाग्रामवरून 'एआय इमेज जनरेशन' फीचर हटवले

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

इन्स्टाग्राम युजर्सच्या प्रायव्हसीला धोका निर्माण झाल्यामुळे मेटा कंपनीने आपले 'म्युझ इमेज' एआय टूल बंद केले आहे. या फीचरद्वारे पब्लिक अकाउंट असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे एआय फोटो फक्त प्रॉम्प्टमध्ये टॅग करून बनवणे शक्य झाले होते. या फीचरचा गैरवापर सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर झालेल्या जोरदार विरोधापुढे झुकत मेटाने हे वादग्रस्त फिचर तातडीने काढून टाकले आहे.

या आठवड्याच्या सुरूवातीला, 'मेटा' कंपनी पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली. या टेक दिग्गज कंपनीने 'म्युझ इमेज' हे आपले नवीन एआय इमेज जनरेशन टूल लाँच केले होते, परंतु हे फिचर चुकीच्या कारणांमुळे सोशल मीडियावर व्हायरल झाले.




### फीचर बंद करण्यात आले

या फीचरद्वारे कोणीही व्यक्ती, पब्लिक इन्स्टाग्राम अकाउंट असलेल्या युजर्सचे नाव प्रॉम्प्टमध्ये फक्त टॅग करून, त्यांचे एआय फोटो तयार करू शकत होती. या फीचरला झालेल्या तीव्र विरोधानंतर, मेटाने हे फिचर पूर्णपणे हटवण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या एका ब्लॉग पोस्टमध्ये, या तंत्रज्ञान कंपनीने 'म्युझ इमेज' मधील हे विशिष्ट फीचर तात्पुरते बंद (सस्पेंड) करत असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. मेटाने लिहिले, की लोकांना एक उपयुक्त कल्पक टूल उपलब्ध करून देणे आणि लोकांच्या पब्लिक कंटेंटचा (माहितीचा) या पद्धतीने वापर केला जावा की नाही, याचे नियंत्रण त्यांना देणे हा आमचा हेतू होता.

इंटरनेटवर आलेल्या प्रतिक्रिया ऐकल्यानंतर, आपला निर्णय चुकला असल्याचे या दिग्गज कंपनीने मान्य केले आहे. मेटाने 'म्युझ इमेज'ची घोषणा केल्यानंतर अनेक युजर्सनी गोपनीयतेबद्दल चिंता व्यक्त केली होती.

कंपनीने पुढे म्हटले, की हे फीचर आमच्या अपेक्षेप्रमाणे काम करू शकले नाही, अशा प्रतिक्रिया आम्हाला मिळाल्या आहेत, त्यामुळे आता हे फीचर उपलब्ध नाही. 'मेटा'ने हे विशिष्ट फीचर हटवले असले, तरी सामान्य इमेज जनरेशनसाठी 'म्युझ इमेज' अजूनही उपलब्ध आहे.

### गैरवापर होण्याची दाट शक्यता

यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या संमतीशिवाय कोणीही त्यांचे एआय फोटो तयार करू शकते, अशी भीती निर्माण झाली होती; ज्याचा गैरवापर होण्याची दाट शक्यता होती. मात्र, सर्व प्रायव्हेट अकाउंट्स आणि १८ वर्षांखालील युजर्सच्या अकाउंट्सना या फीचरमधून वगळण्यात आले होते. आता, जर तुम्ही मेटा एआयमध्ये कोणाचे इन्स्टाग्राम अकाउंट टॅग करून फोटो तयार करण्याचा प्रयत्न केला, तर हा एआय चॅटबॉट असा फोटो तयार करण्यास नकार देतो.

### 'मेटा'ने हे नवीन एआय फीचर का हटवले?

यामागील पार्श्वभूमी सांगायची तर या फीचरबाबतची सर्वात मुख्य चिंता ही होती की, सर्व पब्लिक इन्स्टाग्राम अकाउंट्स यामध्ये बाय-डिफॉल्ट 'ऑप्टेड-इन' (ऑप्टेड-इन म्हणजेच समाविष्ट) होते. याचा अर्थ असा, की जर तुमच्या फोटोंचा वापर करून दुसऱ्या कोणी एआय फोटो तयार करू नये, असे तुम्हाला वाटत असेल, तर तुम्हाला स्वतः सेटिंग्समध्ये जाऊन मॅन्युअली (स्वतःहून) ही परवानगी नाकारावी लागत होती.

याशिवाय जेव्हा एखादी व्यक्ती तुमच्या इन्स्टाग्राम अकाउंटचा वापर करून एखादा एआय फोटो तयार करायची, तेव्हा मेटा युजर्सना त्याची कोणतीही सूचना देत नव्हते.

# संत ज्ञानेश्वरांच्या विचारांनी पैलाडवासी मंत्रमुग्ध

## 'मसाप'तर्फे जनसामान्यांपर्यंत संत साहित्य पोहोचविण्याचा प्रयत्न

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) शाखा, अमळनेर यांच्या वतीने संत साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमांतर्गत पैलाड येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहात ज्येष्ठ अभ्यासक सी. एस. पाटील यांचे 'संत ज्ञानेश्वर : जीवन आणि कार्य' या विषयावर अभ्यासपूर्ण व रसाळ व्याख्यान झाले. संत ज्ञानेश्वरांच्या जीवनकार्याचा, त्यांच्या विचारांचा आणि समाजप्रबोधनातील योगदानाचा उलगडा करताना पाटील यांनी श्रोत्यांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.



*अमळनेर : महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे आयोजित उपक्रमांतर्गत पैलाड भागातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात 'संत ज्ञानेश्वर : जीवन आणि कार्य' या विषयावरील व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ अभ्यासक सी. एस. पाटील. समोर उपस्थित श्रोते.*

आपल्या ओघवत्या आणि प्रभावी शैलीत बोलताना पाटील यांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा वेध घेतला. ज्ञानेश्वरीतील ओव्या, संतांचे अभंग आणि विविध ऐतिहासिक संदर्भांच्या माध्यमातून त्यांनी संत साहित्याची वैशिष्ट्ये उलगडून सांगितली. त्यांच्या सखोल अभ्यासामुळे व्याख्यान ज्ञान, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधनाचा सुंदर संगम ठरले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर हे केवळ आध्यात्मिक संत नव्हते, तर तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेला विचारांनी हादरा देणारे कृतिशील समाजसुधारक होते, असे सांगितले. वर्णव्यवस्था, जातिभेद, कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांच्या जोखडात अडकलेल्या समाजाला त्यांनी समता, करुणा आणि भक्तीचा मार्ग दाखविला. भागवत धर्माचा खरा अर्थ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून समाजमन जागृत करण्याचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले. आज महाराष्ट्र ज्या संतपरंपरेचा अभिमान बाळगतो त्याचे मोठे श्रेय संत ज्ञानेश्वरांना जाते, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

भाऊसाहेब देशमुख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ज्ञानेश्वर मराठे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) शाखा, अमळनेरचे अध्यक्ष संदीप घोरपडे होते. या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी गोकुळ पाटील तसेच ॲड. रामकृष्ण उपासनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा अमळनेरचे पदाधिकारी, राष्ट्रीय कीर्तनकार उपासनी महाराज, परिसरातील साहित्यप्रेमी, संत साहित्याचे अभ्यासक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*अमळनेर : शहरातील नदीकाठच्या भोईवाडा परिसरात या तुटलेल्या वीजखांबामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.*

# तुटलेला वीजखांब धोकादायक; भोईवाड्यातील नागरिकांत भीती

ग्लोबल महातेज वृत्तेसवा

अमळनेर : शहरातील नदीकाठच्या भोईवाडा परिसरात तुटलेल्या वीजखांबामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी एका मालवाहतूक करणाऱ्या वाहनाच्या धडकेत हा वीजखांब तुटला. त्यानंतर महावितरणने खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित वीजपुरवठा बंद केला असला, तरी तुटलेला खांब अद्याप धोकादायक अवस्थेत उभाच असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

नागरिकांच्या सांगण्यानुसार संबंधित तुटलेला खांब सध्या तात्पुरत्या आधारावर उभा आहे. या मार्गावरून भोईवाडा, माळीवाडा परिसरातील नागरिक, शालेय विद्यार्थी, पादचारी तसेच दुचाकीस्वारांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. जोरदार वारा किंवा पावसामुळे हा खांब कोसळल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी महावितरणकडे याबाबत वारंवार पाठपुरावा केला असता खांब बदलण्याची जबाबदारी अमळनेर पालिकेची असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे नेमकी जबाबदारी कोणाची? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, संबंधित विभागांकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत असून महावितरण आणि पालिका यांनी समन्वयातून धोकादायक वीजखांब तत्काळ हटवून नवीन खांब उभारावा, अशी मागणी केली आहे.

# सर्वांसाठी फायदेशीर नाहीत काजू; 'या' लोकांनी मर्यादा पाळा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

काजू पौष्टिक असले तरी सर्वांसाठी सारखेच योग्य असतील असे नाही. नट्सची ॲलर्जी असलेल्या व्यक्तींनी काजू टाळावेत. काजूमध्ये कॅलरीज जास्त असल्याने वजन नियंत्रणासाठी प्रमाण महत्त्वाचे आहे.

किडनीच्या काही रुग्णांना पोटॅशियम किंवा इतर खनिजांबाबत मर्यादा असू शकतात; वैद्यकीय सल्ला आवश्यक आहे. जास्त प्रमाणात काजू खाल्ल्यास अपचन किंवा पोटदुखीचा त्रास होऊ शकतो.

काही लोकांमध्ये विशिष्ट खाद्यपदार्थ मायग्रेनचे ट्रिगर ठरू शकतात. मीठ लावलेले किंवा प्रक्रिया केलेले काजू जास्त खाल्ल्यास सोडियमचे प्रमाण वाढू शकते. संतुलित आहाराचा भाग म्हणून मर्यादित प्रमाणात काजू सेवन करणे अधिक योग्य मानले जाते.



# वजन कमी करण्यासाठी दालचिनी ठरते बहुउपयुक्त

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



दालचिनीमध्ये अँटिऑक्सिडंट आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत होण्यास मदत मिळू शकते.

दालचिनीचा चहा पोटातील गॅस, अपचन आणि फुगण्याच्या समस्यांपासून आराम देण्यास मदत करू शकतो. त्यामुळे पचनसंस्था अधिक चांगल्या प्रकारे कार्य करते.

दालचिनी चयापचय (मेटाबॉलिझम) सुधारण्यास मदत करू शकते. संतुलित आहार आणि व्यायामासोबत याचा समावेश केल्यास वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत मिळू शकते.

काही संशोधनांनुसार दालचिनी इन्सुलिनची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करू शकते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास हातभार लागू शकतो.

दालचिनीतील अँटिऑक्सिडंट्स शरीरातील दाह कमी करण्यास मदत करतात. यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यास मदत होऊ शकते.

गरम दालचिनीचा चहा घशाला आराम देतो. त्यातील नैसर्गिक गुणधर्म सर्दी आणि खोकल्याची लक्षणे कमी करण्यास मदत करू शकतात.

दालचिनीचा सुगंध आणि त्यातील पोषक घटक शरीराला उत्साही ठेवण्यास मदत करतात. दिवसाची सुरुवात या चहाने केल्यास ताजेतवाने वाटू शकते.

१ कप पाणी उकळा. त्यात १ छोटा दालचिनीचा तुकडा किंवा अर्धा चमचा दालचिनी पावडर घाला. ५ ते ७ मिनिटे उकळू द्या. गाळून घ्या आणि आवडीनुसार मध घालून प्या.

## दैव देते आणि कर्म नेते!

# महिलेला लागली १५३ कोटींची लॉटली, पण आईने केली चूक

## पैसे गेले पाण्यात, सर्वत्र होत आहे हसू...!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

'दैव देते आणि कर्म नेते' ही म्हण तुम्ही शाळेत असल्यापासून अनेकदा ऐकली असेल. म्हणजे नशीब तुम्हाला यशस्वी होण्यासाठी मोठी संधी देते, पण तुमच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकीच्या निर्णयामुळे ती संधी हातातून निघून जाते. असाच काहीसा प्रकार एका महिलेसोबत घडला आहे. एका छोट्याशा चुकीमुळे तिचे तब्बल १५३ कोटी रुपयांचे नुकसान होण्याची वेळ आली आहे. तिच्या आईने तो निर्णय घेतला नसता, तर कदाचित आज ती करोडपती बनली असती. चला पाहूया हे व्हायरल प्रकरण नेमके काय आहे?


ब्रिटनमध्ये राहणाऱ्या कॅथ मेन या ४६ वर्षीय महिलेने १२ दशलक्ष पौंडांच्या (भारतीय चलनानुसार १५३ कोटी रुपये) लॉटरीचे तिकीट खरेदी केले होते. ती गेली २० वर्षे नियमितपणे आपल्या आईमार्फत एकाच सहा आकड्यांची लॉटरी खरेदी करत आहे. आई तिच्यासाठी खूप लकी आहे, असे तिला वाटते. आणि यावेळी हा लक फॅक्टर खरोखर कामी आला होता. पण एका छोट्याशा चुकीमुळे सगळी गडबड झाली.




लॉटरीचा निकाल लागल्यानंतर आई ते तिकीट दुकानात तपासायला घेऊन गेली. मात्र, ते तिकीट मशीनमध्ये व्यवस्थित स्कॅन झाले नाही. बहुधा त्यावेळी मशीनमध्ये काहीतरी बिघाड झाला असावा. पण आईने ते तिकीट दुसऱ्या दुकानात तपासून पाहण्याऐवजी नशीब खराब आहे, असे समजून कचऱ्यात फेकून दिले. काही दिवसांनी वृत्तपत्रातील लॉटरीसंबंधी एका बातमीवर कॅथचे लक्ष गेले. १२ दशलक्ष पौंडांचे एक विजयी तिकीट अजूनही कोणी क्लेम केलेले नव्हते. आश्चर्य म्हणजे त्या विजयी तिकिटावरील सहाही आकडे कॅथच्या तिकिटावरील आकड्यांशी जुळत होते. हे पाहताच तिने आनंदाने आईला फोन केला. पण तोपर्यंत आईने ते तिकीट आधीच कचऱ्याच्या डब्यात फेकून दिले होते.

लॉटरीचे तिकीट कचऱ्यात फेकून दिले असले, तरी नॅशनल लॉटरी चालवणाऱ्या ऑलविन कंपनीने हे प्रकरण गांभीर्याने घेत चौकशी सुरू केली आहे. खरोखर मशीनमध्ये बिघाड झाला होता का, हे तपासण्यासाठी त्या मशीनची लॅब चाचणी केली जात आहे. तसेच तिकीट स्कॅन केल्यानंतर स्क्रीनवर काही दिसले नसले, तरी मशीनच्या मेमरीमध्ये प्रत्येक व्यवहाराची नोंद असते. कोणत्या क्रमांकाचं तिकीट कोणी खरेदी केले, तसेच पेमेंटचे तपशीलही त्यात जतन केलेले असतात. कारण काही वेळा तिकीट हरवते किंवा चोरीला जाते. अशा परिस्थितीतही विजेत्याला बक्षीस मिळू शकते, अशी तरतूद आहे. मात्र, या प्रकरणाची चौकशी सुमारे ३० दिवस चालणार असून, त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. कॅथने वृत्तमाध्यमांना सांगितले, की जर तिला ही लॉटरी मिळाली, तर सर्वप्रथम ती न्यूझीलंडचा दौरा करणार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# पाळीव प्राण्यांचे नेहमी अंग खाजवणे आणि पायाला चावणे यामागे असू शकते 'हे' कारण

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मांजरी आणि कुत्र्यांना परागकण आणि अगदी माणसांची देखील ॲलर्जी असू शकते. मात्र त्याचे निदान होणे ही एक दीर्घ आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे. तुम्हाला आठवडाभरापासून शिंका येत असतील आणि डोळ्यातून सतत पाणी येत असेल तर हा ॲलर्जीचाच हंगाम आहे. पण असा त्रास होणारे तुम्ही एकटेच नाही. तुमच्या पाळीव प्राण्याला अलीकडे जास्त खाज सुटत असेल, तो रात्रभर खाजवत असेल तर कदाचित त्यामुळे तुमची झोप होत नसेल. त्याच्या डोळ्यातून सतत पाणी येणे आणि इतर त्रासांनी ते तुमच्याएवढेच दुःखी किंवा त्रासलेले असू शकतात. पण म्हणजे तुमचा कुत्रा किंवा मांजरदेखील परागकणांमुळे होणाऱ्या त्रासाला सामोरे जात असतील का? चार पायांच्या या मित्रांनादेखील 'हे फीव्हर' म्हणजे परागकणांपासून होणाऱ्या ॲलर्जीचा किंवा सीझनल ॲलर्जीचा त्रास होत असतो. मात्र असंख्य ॲलर्जींपैकी ही फक्त एक शक्यता आहे. यात काही ॲलर्जी अशा आहेत, ज्यांची तुम्ही कल्पनाही केली नसेल. आपल्या पाळीव प्राण्यांना नेमका कशाचा त्रास होतो आहे, हे शोधून काढणे गुंतागुंतीचे असू शकते. मात्र आता ही गोष्ट सोपी होते आहे.

## ॲलर्जीची लक्षणे कोणती?

आपली रोगप्रतिकारक शक्ती आपल्या सभोवतालच्या वातावरणातील एखाद्या घटकावर अचानक हल्ला करायचे ठरवते, तेव्हा ॲलर्जी होते. मग ते हवेत नव्याने पसरलेले परागकण असू शकतात किंवा आपण वर्षानुवर्षे वापरत असलेला एखादा सुगंध किंवा परफ्यूम असू शकतात. माणसांना शिंका येणे किंवा नाक गळत असल्यास नाक ओढणे यासारख्या गोष्टींवरून ॲलर्जी झाल्याची खबर मिळू शकते किंवा सुगावा लागू शकतो. मात्र मांजरी आणि कुत्र्यांमध्ये ही लक्षणे कमी प्रमाणात आढळतात. पाळीव प्राण्यांमध्ये डोळ्यातून जास्त प्रमाणात पाणी वाहणे आणि नाक वाहणे ही लक्षणे असू शकतात. त्याचबरोबर मांजरीमध्ये दमा आणि कुत्र्यांमध्ये कानात संसर्ग होणे किंवा डोके हलवणे ही लक्षणे असू शकतात. ॲलर्जी बहुतांशवेळा त्वचेवर ॲटोपिक डर्माटायटिसच्या म्हणजे त्वचेच्या जुनाट आजाराच्या स्वरूपात दिसतात. सतत येणाऱ्या खाजेमुळे प्राणी त्यांचे पाय किंवा शरीरावरील इतर भाग सतत, खूप जास्त प्रमाणात चाटतात, चघळतात किंवा चावतात. यामुळे 'हॉट स्पॉट्स' तयार होऊ शकतात. हॉट स्पॉट म्हणजे शरीरावरील लालसर भाग. त्याचे काही तासांमध्येच 'भयानक जखम किंवा व्रणांमध्ये' रूपांतर होऊ शकते, असे ब्रायन कॉलिन्स म्हणतात. ते न्यूयॉर्कमधील कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ व्हेटर्नसी मेडिसीनमध्ये पशुवैद्य (व्हेटरिनरियन) आहेत. या स्थितीमध्ये आणखी वाढ होण्यापासून त्याला आळा घालणे आवश्यक असते. कारण दीर्घकाळापासूनच्या किंवा जुनाट हॉट स्पॉट्सचा फायदा घेऊन जिवाणू किंवा यीस्ट एक वेदनादायी संसर्ग निर्माण करू शकतात.

## मग, ही नक्की ॲलर्जीच आहे का?

ज्या गोष्टींमुळे माणसांना ॲलर्जी होऊ शकते, त्याच गोष्टींमुळे पाळीव प्राण्यांनादेखील ॲलर्जी होऊ शकते. अशा गोष्टी म्हणजे परागकण, गवत, कीटक, अन्न, धुळीचे कण, परफ्यूम. बाजारात पाळीव प्राण्यांसाठी उपलब्ध असलेल्या ॲलर्जीसाठीच्या चाचण्या करण्याचा तुम्हाला मोह होऊ शकतो. सोशल मीडियावर अशा चाचण्यांची जाहिरात अनेकदा केली जाते. त्यांच्यामुळे ॲलर्जीमागचे कारण समोर येते, असे सांगितले जाते.

जॅकलीन बॉइड नॉटिंगहॅम ट्रेंट विद्यापीठात वरिष्ठ प्राध्यापक आहेत. या चाचण्यांचा उपयोग होत नाही, असा इशारा जॅकलीन देतात. (एका चाचणीत तर मुलायम कापडाच्या खेळण्यावरील मऊ फर किंवा केसांमधून स्वॅब दिल्यावरही सारखेच परिणाम दिसून आले.) तसेच कोणत्याही परिस्थितीत तुम्ही तुमच्याकडे असलेली अँटीहिस्टामाईन औषधे देऊ नयेत. कारण अनेक गोष्टी ज्या ॲलर्जीसारख्या वाटतात त्या तशा नसतात. 'यातील बरेचसे काम हे उघड किंवा स्पष्ट दिसणाऱ्या शक्यता नाकारण्याचे असते,' असे त्या म्हणाल्या.

'आम्ही सर्वात आधी त्वचेला संसर्ग झाला आहे का? याचा शोध घेतो,' असे कॉलिन्स म्हणाल्या. उपचारामुळे खाज येणे थांबले तर त्यातून समस्येचे उत्तर मिळते. पुढील पायरी म्हणजे छोटे किडे किंवा पिसवे आहेत का? याची तपासणी करणे. ते चावणे अनेक कारणांमुळे त्रासदायक ठरू शकते. तुम्ही कदाचित असा आक्षेप घेऊ शकता की तुमच्या कुत्र्यावर पिसवे टाळण्याचे उपचार आधीच घेण्यात आले आहेत. मात्र पिसवांचा नायनाट करणे कठीण असू शकते. कारण पिसवे चलाख असतात. ते इतर पाळीव प्राणी (विशेषकरून मांजर) किंवा घरात इतरत्र लपून बसू शकतात. कुत्र्यांमध्ये त्यांचा प्रादूर्भाव होऊ शकत नसला तरी ते तुमच्या कुत्र्यावर बसून त्याचा पटकन चावा घेण्यास आणि नंतर त्यांच्या नेहमीच्या यजमानाकडे परतण्यास उत्सुक असतात. काही कुत्र्यांना पिसवांच्या लाळेची तीव्र ॲलर्जी होऊ शकते. यातील आणखी गुंतागुंत म्हणजे पिसवांच्या काही प्रजाती हंगामी स्वरुपाच्यादेखील असतात. त्यामुळे तुम्हाला चुकून या ॲलर्जीमागचे कारण परागकण असल्याचे वाटू शकते.

काही दुर्मिळ प्रकरणांमध्ये किंवा क्वचित, त्वचेला येणाऱ्या खाजेतून कर्करोग किंवा चयापचयाचे आजार सारख्या अधिक गंभीर आजारांची लक्षणं दिसू शकतात. विशेषतः वृद्ध मांजरी किंवा कुत्र्यांमध्ये ते दिसू शकते. तुम्ही आणि तुमच्या व्हेटर्नरी डॉक्टरने या शक्यता लक्षात घेतल्या असतील आणि तरीदेखील त्या पाळीव प्राण्याला खाज येणे सुरूच असेल, तर त्यानंतर खरी तपासणी किंवा शोध सुरू होतो.

## ॲलर्जीच्या लक्षणांवर उपचार करणे

यातील सर्वांत महत्त्वाची पहिली पायरी म्हणजे खाज नियंत्रणात आणणे. 'त्या प्राण्याला आराम पडला पाहिजे,' असे कॉलिन्स म्हणतात. यासाठी इंजेक्शन, तोंडावाटे घ्यायची औषधे, शॅम्पू आणि स्प्रे यासारखे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. या उपचारांमध्ये बरीच प्रगती झाली आहे. पूर्वी ॲलर्जी असलेल्या पाळीव प्राण्याला स्टिरॉईडचे इंजेक्शन दिले जायचे. त्याचा उपयोग व्हायचा, मात्र त्याचे मोठे दुष्परिणाम होते.यात खूप जास्त तहान लागणे, लघवीचे प्रमाण वाढणे, वजन वाढणे आणि रोगप्रतिकार शक्ती कमी होणे या गोष्टींचा समावेश होता. त्यामुळे संधीसाधू स्वरूपाचे संसर्ग त्या प्राण्याच्या शरीरात शिरकाव करू शकतात. मात्र काही वर्षांपूर्वी अधिक नेमकेपणाची किंवा ॲलर्जीला अधिक योग्यप्रकारे लक्ष्य करणारी औषधे उपलब्ध झाली. ही औषधे रोगप्रतिकारक व्यवस्थेमध्ये व्यापक स्वरूपात बदल करण्याऐवजी खाज येणे आणि इन्फ्लमेशनच्या समस्येवर अधिक अचूकतेने परिणाम करतात. यात सायटोकिन्स नावाच्या रसायनांद्वारे सक्रिय केलेल्या एन्झाईमना प्रतिबंध केला जातो. अशा नवीन बदल आणि सुधारणांमुळे आजची औषधे अधिक प्रभावी आहेत. त्यांचे दुष्परिणाम कमी आहेत. तसेच ८० टक्के कुत्र्यांना त्याचा उपयोग होतो, असे राल्फ मुलर म्हणतात. ते म्युनिक विद्यापीठतील एक व्हेटर्नरी डर्मेटोलॉजिस्ट आहेत. 'जर नियमितपणे व्यवस्थित दिली तर सहसा ती पुरेशी असतात. मात्र तरीदेखील १५ टक्के कुत्र्यांमध्ये त्याचा उपयोग होत नाही किंवा त्यांना प्रतिसाद मिळत नाही. तसेच ज्यांच्या बाबतीत चांगला प्रतिसाद मिळतो त्यांना अनिश्चित काळ अधिक सहन करता येणारी औषधे द्यावी लागतात. त्यातून काही प्राण्यांमध्ये त्यासाठीची प्रतिरोधकता तयार होते. काहीवेळेस हंगामी स्वरूपाच्या ॲलर्जी चेरूपांतर सततच्या ॲलर्जीमध्ये होऊ शकते, असे कॉलिन्स म्हणतात. या आणि इतर कारणांमुळे अनेकजणांना त्यांच्या पाळीव प्राण्यांमधील ही मूळची समस्या कायमची दूर करायची असते.

## खरे कारण शोधून काढणे

पशुवैद्य किंवा व्हेटर्नरी डॉक्टर प्राण्यांची जीवनशैली आणि त्यांच्या आधीच्या गोष्टींबद्दल अनेक प्रश्न विचारतात. त्यातून एकेक संभाव्य कारण किंवा घटक टप्प्याटप्प्यानं वगळत ॲलर्जी निर्माण करणारा घटक किंवा पदार्थ (म्हणजेच ॲलर्जेन) शोधला जातो. 'मी माझ्या सर्व क्लायंट्सना कुत्र्यांची डायरी ठेवण्याचा सल्ला देतो,' असं बॉइड म्हणतात. त्यातून त्यांचे वेगवेगळे पॅटर्न पटकन समोर येतात.

काही लक्षणे काही महिन्यांमध्येच वाढतात आणि इतर हंगामी स्वरूपाची नसतात. जी लक्षणे कायमच आढळतात ती अन्न किंवा त्यांच्या सभोवतालमध्ये सतत असणाऱ्या गोष्टीशी संबंधित असू शकतात. 'आपल्याकडे कोणतीही अशी एकच चाचणी उपलब्ध नाही जी ॲलर्जी असणारा आणि ॲलर्जी नसणारा यांच्यात फरक करू शकेल,' असे मुलर पुढे म्हणतात. आता व्हेटर्नरी डर्मेटोलॉजिस्टकडे जाण्याची वेळ असते. हे तज्ज्ञ दुर्मिळ असतात. मात्र इंट्राडर्मल ॲलर्जी चाचणी करण्यासाठी तेच सर्वात योग्य व्यक्ती असतात, असे कॉलिन्स म्हणतात. मग प्राण्यांना भूल देऊन झोपेत किंवा बेशुद्धावस्थेत नेले जाते. नंतर त्यांच्या त्वचेवरील काही भाग त्यावरील केस काढून साफ केला जातो. तिथे एक ग्रीड म्हणजे ठिपक्यांची किंवा चौकटींची एक जाळी आखली जाते. मग चौकटीतील प्रत्येक भागावर वेगवेगळे ॲलर्जी निर्माण करणारे पदार्थ किंवा त्यांचा एक गट चौकटीवरील त्याच्यासाठी ठरवून दिलेल्या जागेवर टोचला (इंजेक्ट) जातो. त्यानंतर डर्मेटोलॉजिस्ट त्या त्वचेवरील प्रतिक्रियेचं निरीक्षण करतात.

## पाळीव प्राण्यांची इम्युनोथेरपी (पेट इम्युनोथेरपी)

चाचणीतून निकाल समोर आल्यानंतर, पाळीव प्राण्यांच्या मालकाकडे दोन पर्याय असतात. फक्त लक्षणांवर उपचार करत राहणं किंवा त्यासंदर्भातील मूळची संवेदनशीलतेची समस्या दूर करणे. आधीचा उपाय सोपा आहे. मात्र जर तुम्हाला तुमची मांजर किंवा कुत्र्याची औषधं कमी करायची असतील तर तुम्ही ॲलर्जीचा पूर्ण नायनाट करण्यासाठी पावले उचलू शकता. म्हणजेच एक असा प्रोटोकॉल किंवा पद्धती जी तुमच्या पाळीव प्राण्याच्या रोगप्रतिकारक व्यवस्थेला ॲलर्जेनच्या बाबतीत सक्षम करेल किंवा त्याची संवेदना कमी करेल. याला ॲलर्जेन-स्पेसिफिक म्हणजे विशिष्ट ॲलर्जेनसंबंधित इम्युनोथेरपी म्हणतात. व्हेटर्नरी डर्मेटोलॉजिस्ट बहुधा ॲलर्जीसाठी जबाबदार घटकांना इम्युनोथेरपी कॉकटेलमध्ये टाकतात. मग ते तुमच्या पाळीव प्राण्यांच्या शरीरात हळूहळू वाढत्या प्रमाणात इंजेक्शनद्वारे सोडले जाते. प्रोटोकॉल फक्त लक्षणांवरच नाही तर मूळ कारणांवर उपचार करतो. हे उपचार झाल्यावर अनेक पाळीव प्राणी बहुतांशपणे बरे होतात किंवा किमान त्यांची लक्षणे कमी होतात. या उपचाराचे फक्त दोन दुष्परिणाम आहेत. ॲनाफिलेक्टिक शॉक (हा खूपच दुर्मिळ आहे - मुलर यांनी ४३ वर्षांमध्ये त्याची फक्त ५ प्रकरणे पाहिली आहेत) आणि दुसरा म्हणजे खाज येण्यात तात्पुरती वाढ होणे. मात्र प्रत्येकजण ते शेवटपर्यंत पूर्ण करू शकत नाही. कारण यासाठी प्रारंभिक किंवा मूळ खर्च जवळपास १३०० डॉलर्स (अंदाजे १,२३,२६६ रुपये) आहे. तसेच त्याचे निकाल किंवा निष्कर्ष पाहण्यासाठी एक वर्ष लागू शकते. पाळीव प्राण्याच्या मालकांना इंजेक्शन देण्याचा कंटाळा न येणे आणि पुरेसा अनुभव असलेले व्यावसायिक किंवा चिकित्सक यांच्यावर यश अवलंबून असते. यातील चांगली बातमी अशी आहे की चांगली औषधे लवकरच उपलब्ध होण्याच्या मार्गावर आहेत. नवीन सहाय्यक आणि चांगली पद्धती यामुळे एक वर्षांचा कालावधी कमी होऊन सहा आठवड्यांचा होऊ शकतो. जपानच्या बाजारपेठेत आधीच औषधे उपलब्ध आहेत. आता युरोपियन युनियनमधील नियामक संस्थेच्या मंजूरीची वाट पाहिली जात आहे, असे मुलर म्हणतात. 'मग ॲलर्जीसंदर्भातील संवेदनशीलता कमी करण्यामध्ये एक मोठा आमूलाग्र बदल होईल,' असं ते म्हणतात.

## पाळीव प्राण्यांमधील ॲलर्जीचे प्रमाण वाढते आहे का?

यासंदर्भातील दोष अनेकदा प्रजननकर्त्यांना (ब्रीडर) दिला जातो. ते रोगप्रतिकारक आरोग्याकडे दुर्लक्ष करून फक्त दिसणे आणि फॅशनवर लक्ष केंद्रित करतात. मुलर म्हणतात, मात्र हे अधिक सोपे किंवा सुलभ करून सांगितल्यासारखे आहे. 'पाळीव प्राण्यांच्या आरोग्याची जबाबदारी ही त्यांच्या मालकांवर आणि या प्राण्यांना त्यांचे मालक कशाप्रकारची जीवनशैली देतात यावरही ठरवली जाऊ शकते. मानवी जीवनाबरोबरच या प्राण्यांचं आयुष्यदेखील बदललं आहे', असे ते म्हणतात. आपल्याप्रमाणेच हे प्राणीदेखील आता बाहेर कमी वेळ घालवतात. ते प्रक्रिया केलेल्या अन्नाद्वारे अधिक प्रमाणात कॅलरीज खातात. त्यांना अधिक वेळा धुतले किंवा अंघोळ घातली जाते. तसेच त्यांच्यावर विविध उत्पादनांद्वारे परफ्यूमचा अधिक वापर केला जातो. या उत्पादनांमध्ये ॲलर्जेन असू शकतात.

संभाव्य ॲलर्जेन शस्त्रागारात एक नवीन घटकदेखील असू शकतो. तो म्हणजे माणूस. इतर प्राण्यांप्रमाणेच आपणदेखील कोंडा उत्सर्जित करतो. कुत्र्यांना माणसाच्या या कोंड्याची ॲलर्जी असू शकते. पाळीव प्राण्यांना माणसांमुळे ॲलर्जी होणं ही किती सामान्य बाब आहे, हे स्पष्ट करण्यासाठी फारसा चांगला डेटा किंवा माहिती उपलब्ध नाही, असे कॉलिन्स म्हणतात. मात्र बॉइड म्हणतात की हल्लीच्या काळात आपण आपल्या पाळीव प्राण्यांसोबत ज्याप्रकारे राहतो, त्यामुळे ते आपल्या संपर्कात येण्याची शक्यता अधिक असते.

'पिसवा आणि गोचिडासारखा कीटक यांच्यासंदर्भातील उपचारांपूर्वी, आपण कधीही कुत्र्यांना आपल्या अंथरुणात झोपू देत नसू. मात्र आता ते आपल्या चादरी वापरतात,' असे बॉइड म्हणतात.

# ₹६ लाख की सेविंग से खड़ी कर दी ₹२.२ करोड़ की कंपनी, कमाल का है ये बिजनेस...!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सक्सेस स्टोरी

रांची की एक महिला ने कमाल कर दिया है। उनका नाम रितु पाठक है। उन्होंने सह-संस्थापक बिनोद सिंह के साथ मैन्युफैक्चरिंग के क्षेत्र में उतरने का फैसला किया। साल २०१३ में सिर्फ ६ लाख रुपये की सेविंग के साथ इस बिजनेस की शुरुआत है। उनके स्टार्टअप का नाम 'एचएम हर्बल्स' है। आज यह २.२ करोड़ रुपये के सालाना टर्नओवर वाला सफल कारोबार बन चुका है। यह सटीक और एनवॉयरमेंट-फ्रेंडली डिस्टिलेशन मशीनों की बिक्री करता है। इसके जरिए इस स्टार्टअप ने देश के ६५० से अधिक किसानों और छोटे उद्यमियों को सशक्त बनाया है। अब कंपनी का टारगेट अगले कुछ सालों में १० करोड़ रुपये के रेवेन्यू के आंकड़े को पार करना है। आइए, यहां रितु पाठक की सफलता के सफर के बारे में जानते हैं।

## अपने अनुभव से मिला बिजनेस आइडिया

बात है साल २०१३ की। तब एग्रीप्रेन्योर रितु पाठक को एरोमैटिक फार्मिंग के लिए सही डिस्टिलेशन यूनिट की तलाश थी। खोजने पर उन्हें बाजार में सिर्फ निराशा हाथ लगी। उस समय उपलब्ध पारंपरिक मशीनें जल्दी खराब हो जाती थीं। ईंधन ज्यादा खाती थीं। तेल का उत्पादन भी कम और घटिया देती थीं। इस समस्या को भांपते हुए रितु पाठक और बिनोद सिंह ने खुद मशीनें बनाने का फैसला किया। कारण था कि वे जड़ी-बूटियों, पत्तों, जड़ों और फूलों के व्यवहार को अच्छी तरह समझते थे। उन्होंने ६ लाख रुपये के निवेश से 'एचएम हर्बल्स' की नींव रखी। अपनी पहली २,००० लीटर की हाइड्रो डिस्टिलेशन यूनिट एक किसान को १.५ लाख रुपये में बेची।

## बड़ा है प्रोडक्ट पोर्टफोलियो

शुरुआती दौर में ग्राहकों का भरोसा जीतना और कैश-फ्लो बनाए रखना सबसे बड़ी चुनौती थी। इसे रितु ने भारी डिस्काउंट और बेहतरीन फील्ड सपोर्ट देकर पार किया। आज कंपनी मिनी डिस्टिलेशन,





फील्ड डिस्टिलेशन, हाइड्रो डिस्टिलेशन, अर्क डिस्टिलेशन और इलेक्ट्रिक डिस्टिलेशन सिस्टम की एक बड़ी रेंज बनाती है। इनकी कीमतें छोटे उद्यमियों के लिए १५,००० रुपये से शुरू होकर बड़े उद्योगों के लिए ८० लाख रुपये तक जाती हैं। इन मशीनों का इस्तेमाल आयुर्वेद, कॉस्मेटिक्स, फार्मास्युटिकल और वेलनेस उद्योगों में एसेंशियल ऑयल, हर्बल अर्क और गुलाब जल निकालने के लिए किया जाता है।

## बाजार की कमजोरी को पकड़ा


रितु ने बाजार की इस कमजोरी को पकड़ा कि ज्यादातर बड़ी कंपनियां केवल भारी औद्योगिक मशीनों पर फोकस कर रही थीं। इसलिए उन्होंने छोटे पैमाने की यूनिट्स पर ध्यान दिया जो तेजी से डिलीवर हो सकें। कंपनी ने तकनीक में सुधार करते हुए ऐसी इलेक्ट्रिक डिस्टिलेशन मशीनें तैयार की हैं जो ईंधन की खपत को करीब ३०% तक कम करती हैं। पारंपरिक कूलिंग विधियों के मुकाबले सिर्फ ५% पानी का इस्तेमाल करती हैं। इसके अलावा, कंपनी अब डेटा-संचालित नियंत्रण के लिए टच-पैनल आधारित मॉनिटरिंग सिस्टम भी विकसित कर रही है। इससे लेबर पर निर्भरता कम होगी।

## ग्लोबल मार्केट तक विस्तार

आज कंपनी के पास २४ कर्मचारियों की टीम है। ६,७०० वर्ग फीट का मैन्युफैक्चरिंग प्लांट है। यह अब तक ४,००० से अधिक ग्राहकों को १,१२२ से ज्यादा मशीनें बेच चुका है। साल २०१६ में फेसबुक के जरिए दक्षिण अफ्रीका से मिले पहले एक्सपोर्ट ऑर्डर के बाद आज कंपनी नेपाल, केन्या, श्रीलंका और खाड़ी देशों में भी निर्यात करती है। इसके कुल रेवेन्यू का यह १०% है। हिंडाल्को और टाटा सीएसआर जैसी बड़ी संस्थाएं इसकी क्लाइंट हैं। सबसे खास बात यह है कि एचएम हर्बल्स ने देश भर में लगभग ५,९०० एकड़ में फैली खेती से जुड़े ६००-६५० किसानों को अपनी क्षमता बढ़ाने और कमाई दोगुनी करने में सीधे मदद की है।

# पावसाळ्यात पचनशक्ती का मंदावते?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



पावसाळ्यात आर्द्रतेमुळे आपल्या पचनसंस्थेवर ताण येतो. ज्यामुळे पचनशक्ती मंदावते आणि आजारांचा धोका वाढतो.

पावसाळ्यात पालेभाज्यांमध्ये कीड आणि बॅक्टेरियाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पालक, मेथी यांसारख्या भाज्या खाणे टाळलेलेच बरे.

बाहेरचे उघड्यावरचे अन्न आणि जंक फूडमध्ये दूषित पाणी किंवा बॅक्टेरिया असू शकतात. ज्यामुळे पोटाचे गंभीर विकार होऊ शकतात.

पावसाळ्यात दुध, दही किंवा पनीर पचायला जड जाऊ शकते. यामुळे अपचन किंवा ॲसिडिटीचा त्रास वाढण्याची शक्यता असते.

पावसाळ्यात अन्न लवकर खराब होते. शिळ्या अन्नातून फूड पॉयझनिंगचा धोका असतो, त्यामुळे नेहमी ताजे आणि गरम अन्नच खावे.

पावसाळा हा माशांचा प्रजननाचा काळ असतो. त्यामुळे या काळात मासे खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

कच्च्या भाज्या किंवा फळे नीट धुतली गेली नाहीत, तर त्यावरील जंतू शरीरात जाऊन संसर्ग पसरवू शकतात. नेहमी शिजवलेले अन्न खा. जास्त तेलकट आणि मसालेदार पदार्थ पचनसंस्थेवर अतिरिक्त ताण देतात. यामुळे पोट फुगणे किंवा गॅसची समस्या उद्भवू शकते. पावसाळ्यात पचनासाठी आले, लसूण, आणि गरम पाण्याचा वापर करा. नेहमी घरगुती, साधे आणि पचायला हलके अन्न घेण्यावर भर द्या.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# मना सज्जना...

## ‘मना रे...जनी मौन्यमुद्रा धरावी’

परम स्नेही मित्रहो,

रघुनायक चित्ती धारण केला म्हणजे जन्म सार्थक झाला हे प्रतिपादन आपण समजून घेतले. ‘आपण देवाचे झालो की देव आपला होतो,’ यावर आपला विश्वास हवा. सतत श्रीरामांच्या नामाचा जप करावा. व्यर्थ जिव्हा शिणवू नये. वाणी केवळ श्रीरामांच्या नामाचे उच्चारण करण्यासाठीच झिजावी; अन्यथा मौनच बाळगावे, असे समर्थ पुढील श्लोकात म्हणतात...

**मना रे जनी मौन्यमुद्रा धरावी ।**
**कथा आदरें राघवाची करावी ।**
**नसे राम ते धाम सोडून द्यावे ।**
**सुखालागी आरण्य सेवीत जावें ।। ४४ ।।**

लोकांत वावरताना वायफळ बोलू नये. शक्यतो मौन बाळगावे. बोलायची गरज पडल्यास श्रीरामांचे नाम घ्यावे. येथे मौन म्हणजे नेमके काय? ते समजून घेऊया.

मौन म्हणजे वाणीला विचारपूर्वक दिलेला विराम. केवळ बोलता येते म्हणून वायफळ बडबड करणारे आपल्या आजूबाजूला दिसतात. त्यांच्या बोलण्याला काही अर्थ असेलच असे नाही. परिणामी असे लोक कंटाळवाणे ठरतात. तेव्हा मोजकेच पण मधुर आणि बोलणारे मात्र लोकप्रिय ठरतात. हवेहवेसे वाटतात. या श्लोकात समर्थ ‘मौन्यमुद्रा’ असा शब्द योजतात. याचा अर्थ जनांत, लोकांत वावरताना विचारी मुद्रा ठेवून मौन धारण करावे, असा आहे. या मौनात योग्यवेळी आणि प्रसंगी यथायोग्य उत्तर देण्याचे सामर्थ्य अभिप्रेत आहे. केवळ मुख दुर्बल असणे नव्हे. मौनाचा दुसरा एक अर्थ मनाने आतला संवाद करणे असाही आहे. विचारी मौन आत्म संवाद करायला सर्वोत्तम संधी असतें. एकदा मनाला स्वचिंतन करायची सवय झाली की मग ते आत्मानंदात तल्लीन होते.

पुढे समर्थ मनाला सांगताहेत, की बोलायचेच झाल्यास राम नामाचा महिमा बोलावा. अत्यन्त आदराने राघवाचे भजन करावे.

‘नसे राम ते धाम सोडून द्यावे.’

जेथे श्रीरामांच्या नामाचा जयघोष होत नाही, अशा गृही थांबू नये. आपल्या भक्तीला पोषक अशा ठिकाणीच मनाला सुखप्राप्ती होत असतें म्हणून प्रसंगी अरण्यवास म्हणजे एकांत स्वीकारावा. वनात असलेली शांतता आपल्या साधनेला अनुकूल असे वातावरण असतें. जेणे योगे भक्तीभावाने राघवाचे चिंतन करता येते. पुढील श्लोकात ते अधिक स्पष्ट करून सांगतात.

**जयाचेनि संगे समाधान भंगे ।**
**अहंता अकस्मात येऊनि लागे ।**
**तये संगतीची जनीं कोण गोडी ।**
**जये संगतीने मती राम सोडी ।।४५।।**

मना अरे... ज्याच्या संगतीने तुझी ही भक्ती मार्गांवरील वाटचाल खंडित होईल. समाधान भंगेल. तुझा विरस होईल, अशी दुष्ट संगत का बरे धरावी? साधनेच्या मार्गे तुझी देहबुद्धी लय पावली असता पुन्हा देहबुद्धी दृढ करणाऱ्या प्रवृत्ती टाळलेल्या बऱ्या. अशा दुर्जन लोकांचा संग आपले समाधान घालवून टाकतो. त्या योगे नकळत आपला अहंकार डोके वर काढतो. मग मनाला सैराट व्हायला वेळ लागत नाही. हेच समर्थ पुढील शब्दात मांडतात...

**कदा वाजटाचा नको संग देवा ।**
**धिटाउद्धटामाजी पाषाण्ड ठेवा ।**
**जेणे वृत्ती ढासळे साधकाची ।**
**त्यजा रे त्यजा संगती बाधकाची ।।**

कलही आणि उद्धट लोकांचा संग टाळावा. हा संग धरल्याने साधकांची वृत्ती धासळायला वेळ लागत नाही. तेव्हा त्यांच्या संगतीचा त्याग केलेलाच बरा नव्हे का?

इथे एक उदाहरण आपण पाहूया...

एखादा शिगोशिग भरलेला कलश डोक्यावर घेऊन आपण जर निघालो आणि पायाखालील वाट ही खाचखळगे विरहित असेल तर योग्य त्या ठिकाणी पोहोचेपर्यंत त्या कलशातले पाणी वोसंडत नाही. परंतु तीच वाट जर खाच खळग्यांनी भरलेली आणि दगड धोंड्यांनी युक्त असेल तर चालतांना वेळोवेळी तोल जाऊन ठेच लागून डोईवरच्या कशातील पाणी उचंबळून जाते. मुक्कामाचे ठिकाण येईपर्यंत बरेच पाणी सांडून जाते. तदवत सत्संगती लाभली की मनाला योग्य ती साधना करता येते आणि समाधान प्राप्त होते. तर वाईट संगतीने मनाची देहवृद्धी दृढ होऊन जाते आणि अहंकार मात्र अंगाशी येतो.

**।। जय जय रघुवीर समर्थ! ।।**

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : ९४२०३ ८९५४१**

# सूर्य पूजेला रविवारचेच जास्त महत्व का आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्याला ग्रहांचा राजा मानले जाते. सूर्य उगवल्यावर जगातील अंधकार नाहीसा होतो. सूर्य देव हे एकमेव असे देव आहेत ज्यांचे दरदोज दर्शन होते. धार्मिक मान्यतेनुसार रविवार हा सूर्य देवांच्या पूजेसाठी समर्पित आहे. हिंदू धर्मानुसार रविवार हा भगवान विष्णू आणि सूर्य देवांना समर्पित आहे. रविवारी सूर्यदेवांची भक्तीभावाने पूजा केल्यास भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. यासह सूर्याला नियमित अर्घ्य दिल्याने व्यक्तीला जीवनातील प्रत्येक कार्यात यश मिळते, असे मानले जाते. रविवारी सूर्यदेवांना अर्घ्य देण्याचे विशेष महत्त्व आहे. रविवारी सूर्यदेवांना अर्घ्य अर्पण केल्याने अनेक पटींनी लाभ होतो.

### पूजेसाठी रविवारचे महत्त्व

सूर्य देवांना रविवारचा दिवस समर्पित असण्यामागे प्रमुख कारण म्हणजे रविवारी सूर्याची ऊर्जा जास्त असते. ज्याप्रमाणे पौर्णिमेच्या दिवशी चंद्र पूर्णपणे प्रकाशित होतो, त्याचप्रमाणे रविवारी सूर्य अधिक तेजस्वी होत प्रखर सूर्यप्रकाश उत्पन्न होतो. रविवारी सूर्यदेवांची शक्ती अधिक पटींनी वाढते. त्यामुळे पौराणिक मान्यतेनुसार सूर्यदेवांची रविवारी पूजा केल्याने अधिक लाभ होतो.

### रविवार व्रत कथा

एके काळी एका शहरात एक वृद्धा राहत होती. ती दर रविवारी सूर्योदयापूर्वी उठून स्नानादी आटोपून सूर्यदेवांची पूजा करायची आणि त्यानंतर रविवारच्या व्रताची कथा ऐकून ती सूर्यदेवांना नैवेद्य अर्पण करायची. ही म्हातारी पूजेनंतर दिवसातून एकदाच अन्नग्रहण करायची. सूर्यदेवांच्या कृपेने या वृद्धेला कोणत्याही प्रकारची चिंता किंवा त्रास नव्हता. हळूहळू त्याचे घर धन आणि धान्याने भरू लागले. तिची ही परिस्थिती पाहून शेजारच्यांना हेवा वाटू लागला.

म्हातारीने गाय पाळली नाही. त्यामुळे ती अंगण सारवण्यासाठी शेजाऱ्याकडून गायीचे शेण मागायची. त्यानंतर शेजाऱ्याने आपली गाय घरात बांधली. रविवारी शेण न मिळाल्याने वृद्धेला अंगण साफ करता आले नाही. यामुळे ही महिला दुःखी होते. त्या दिवशी ती सूर्यदेवांना नैवेद्य अर्पण करत नाही आणि स्वतः देखील भोजन न करता रात्री झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी वृद्धेला जाग येते तेव्हा तिच्या अंगणात एक सुंदर गाय आणि वासरू दिसते. हे पाहून तिला आश्चर्य वाटते. त्या महिलेने आनंदाने गाईला अंगणात बांधले आणि पटकन चारा आणून तो दिला. यामुळे शेजारी अधिकच जळाले. तेवढ्यात गायीने सोन्याचे शेण दिले. यामुळे ते बघतच राहिले. शेजारीच्यांनी लपून जात लगेच गायीकडे गेला आणि शेण उचलून घरी आणले. सोन्याचे शेण मिळाल्याने काही दिवसांतच ते श्रीमंत झाले. दररोज शेण चोरीचा हा प्रकार सुरू होता. तर या सोन्याच्या शेणाबाबत वृद्धेला काहीच कळले नाही. नेहमीप्रमाणे म्हातारी दर रविवारी सूर्यदेवांसाठी उपवास करून कथा ऐकत राहिली. पण सूर्यदेवांना शेजाऱ्याच्या धूर्तपणाची कल्पना येताच सूर्यदेवांनी जोरदार वादळ निर्माण केले. हे भयंकर वादळ पाहून वृद्धेने गाय घरामध्ये बांधली. मग दुसऱ्या दिवशी सकाळी वृद्धा उठली आणि तिला सोन्याचे शेण बघून आश्चर्य वाटले. त्यानंतर ती वृद्धा नेहमी तिची गाय घरात बांधू लागली. सोन्याच्या शेणामुळे ती वृद्धा काही दिवसांतच खूप श्रीमंत झाली. यामुळे शेजारचे अधिक जळू लागले. शेजारचीने तिच्या पतीला पटवून नगरच्या राजाकडे पाठवले. या गायीबद्दल ऐकून राजाला खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी गाईचे सोन्याचे शेण पाहून राजाला धक्काच बसला. तेव्हा राजाने त्या म्हातारीकडून गाय आणि वासरू दोन्ही हिसकावून घेतले. यानंतर वृद्धेची परिस्थिती पुन्हा दयनीय झाली. यामुळे वृद्धा खूप दुःखी झाली



आणि सूर्यदेवांची प्रार्थना करू लागली. भुकेल्या आणि तहानलेल्या वृद्धेची भगवान सूर्य यांना खूप दया आली. त्याच रात्री सूर्यदेव राजाला स्वप्नात म्हणाले, हे राजा! वृद्धेची गाय आणि वासरू तिच्याकडे त्वरित परत करा. अन्यथा तुमच्यावर संकटांचा डोंगर कोसळेल. त्यानंतर सूर्यदेवांच्या स्वप्नाने घाबरलेल्या राजाने सकाळी उठल्याबरोबर गाय आणि वासरू त्या वृद्धेला परत केले. त्यानंतर राजाने आपल्या चुकीचे प्रायश्चित केले आणि वृद्धेची क्षमा मागितली. यानंतर राजाने शेजारी आणि तिच्या पतीला त्यांच्या या कृत्याबद्दल शिक्षा दिली. तसेच राजाने संपूर्ण राज्यात घोषणा केली, की सर्व जनतेने रविवारचे व्रत व्यवस्थित पाळावे. हे व्रत केल्याने घरात कधीही धन आणि धान्याची कमतरता भासणार नाही. त्यानुसार सर्वांनी उपवास केला. यामुळे राज्य समृद्ध झाले. यासह सर्वांची शारीरिक समस्या देखील दूर झाली.

### रविवार व्रत, पूजाविधी

रविवारी सूर्योदयापूर्वी उठून अंघोळ करून लाल रंगाचे कपडे परिधान करा. सर्वप्रथम सूर्यदेवांना जल अर्पण करत पूजा सुरू करावी. पूजेसाठी घरातील मंदिरात सोन्याची मूर्ती किंवा सूर्याची प्रतिमा स्थापित करावी. यानंतर अक्षता, रक्तचंदन, लाल फुले आणि दुर्वा यांनी भगवान सूर्यांची विधिवत पूजा करावी. पूजेनंतर व्रत कथा ऐका. व्रत कथा ऐकून आरती करावी.

### सूर्यदेवांची आरती

**जय जय जगत्महरणा दिनकर सुखकिरणा ।**
**उदयाचल जगभासक दिनमणि शुभस्मरणा ।।**
**पद्मासन सुखमुर्ती सुहास्यवरवदना ।**
**पद्मकरा वरदप्रभ भास्वत सुखसदना ।। १ ।।**
**जय देव जय देव जय भास्कर सूर्या ।**
**विधिहरिशंकररूपा जय सुरवरवर्या ।। ध्रु० ।।**
**कनकाकृतिरथ एकचक्रांकित तरणी ।**
**सप्तानानाश्वभूषित रथिं ता बैसोनी ।।**
**योजनसहस्त्र द्वे द्वे शतयोजन दोनीं ।**
**निमिषार्धें जग क्रमिसी अद्भुत तव करणी ।। जय० ।।२।।**
**जगदुद्भवस्थितिप्रलय–करणाद्यरूपा ।**
**ब्रह्म परात्पर पूर्ण तूम अद्वय तद्रूपा ।।**
**तत्त्वंपदव्यतिरिक्ता अखंड –सुखरूपा ।**
**अनन्य तव पद मौनी वंदित चिद्रूपा ।। जय० ।। ३ ।।**

### रविवारचे व्रत मंत्र

**ॐ ह्रीं घृणिः सूर्य आदित्यः क्लीं ॐ।**
**ॐ घृणिं सूर्य्यः आदित्यः।**
**ॐ ऐहि सूर्य सहस्त्रांशों तेजो राशे जगत्पते, अनुकंपयेमां भया, गृहाणार्घ्य दिवाकरः ।।**
**ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय नमः ।।**
**ॐ ह्रीं ह्रीं सूर्याय सहस्त्रकिरणराय मनोवांछित फलम् देहि देहि स्वाहा ।।**

### या गोष्टी लक्षात ठेवा

रविवारी व्रत करत असाल तर या दिवशी तांब्यापासून बनवलेल्या वस्तू खरेदी करणे टाळा. या दिवशी निळे, काळे किंवा राखाडी रंगाचे कपडे घालू नयेत. रविवारी दिवसभर उपवास ठेवा आणि सूर्यास्तानंतर एकदाच अन्न घ्या. या दिवशी जेवणात तेल किंवा मीठ वापरू नये. या दिवशी दूध आणि गूळ मिसळून भात खावा.

# वास्तू आणि सूर्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैज्ञानिकदृष्ट्या हे सिद्ध झाले आहे, की मानवी जीवनासाठी सूर्य अतिशय महत्त्वाचा आणि आवश्यक आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वास्तूपंडितांना हे सत्य माहिती होते, अगदी हजारो वर्षांपूर्वी. म्हणूनच ‘सूर्य’ वास्तू निर्मितीमधील एक घटकही बनला. इमारतींच्या रचनांमध्ये त्याचा विचार केला गेला. वास्तुशास्त्राने सूर्यप्रकाशाची जागा, त्याच्या बदलत्या ठिकाणांनुसार बदलती तीव्रता विचारात घ्यावी आणि सूर्यास्तापासून ते सूर्यास्तापर्यंत आणि सीझन ते सीझन अशा इमारतींचे डिझाईन बनवावे.


वास्तुशास्त्राच्या तत्त्वांवर आधारित घरे बांधताना सूर्याच्या दिशेचा विचार महत्त्वाचा आहे. सूर्याभोवती भ्रमण करताना पृथ्वी, उष्णता आणि त्यातील प्रकाश प्राप्त करतो. सूर्य हा खरोखर एक जीवन देणारा ग्रह आहे. वास्तू सिद्धांतांच्या आधारावर आपण मोठ्या इमारती आणि लहान घरे डिझाईन करीत असताना त्यात सूर्यप्रकाशाशी निगडीत दिशांचाही विचार करणे महत्त्वाचे ठरते. आपण हे कधीही विसरू नये, की सूर्यकिरण हा गर्भाचा आणि प्रकाशाचा स्रोत आहे, जो सजीवांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

वास्तू विज्ञानात सूर्यावरील किरणांचे सकारात्मक परिणाम प्राप्त करण्याच्या दिशानिर्देशांवर भर दिला जातो आणि यामुळे अशा दिशानिर्देशांमध्ये वाढत्या तापमानांचा थेट परिणाम होतो. आपल्या दैनंदिन क्रियाशीलतेमुळे दिवसभरातील अधिक ऊर्जा आवश्यक असल्याने, घरे सूर्योदयाच्या दिशेने असायला हवीत जेणेकरून सूर्यकिरणे घरात येऊ शकतील. परंतु सूर्यप्रकाशातील किरणांना अवरूद्ध करणे आजच्या आधुनिक जीवनातील एक प्रवृत्ती असल्याचे दिसते.

आजकाल वास्तुशास्त्र लक्षात ठेवून घरे, दुकाने किंवा कार्यालये बांधण्याकडे खूप कल दिसत आहे. आता कोणतीही इमारत बांधण्यापूर्वी, वास्तुशास्त्रासाठी इमारत योग्य बनवावी असे प्रत्येकजण इच्छितो. वास्तू मार्गदर्शक तत्त्वांच्या नकाशाचा विचार करुन आराखडा तयार करतो.

संपूर्ण विश्वाचा पाया सूर्य आहे ज्याच्या ऊर्जेमुळे संपूर्ण विश्वाला जीवन मिळते. सूर्याच्या ऊर्जेपासूनच पृथ्वीवरील जीवन आहे. सौर यंत्रणेत






सूर्य महत्त्वाचा समजला जातो आणि अग्नीचा आकार विचारात घेतला जातो. सूर्यप्रकाशातील सकारात्मक ऊर्जा वास्तूशास्त्रात खूप महत्त्वाची आहे. या वास्तूशास्त्रामुळे पूर्व आणि उत्तर दिशेला महत्त्व प्राप्त होते. कारण सूर्यापासून सकारात्मक ऊर्जेचा मुख्य दरवाजा पूर्व दिशा आहे. कोणत्याही घरात किंवा इमारतीत, सूर्याची सकारात्मक ऊर्जा उत्तर–पूर्वेकडून येते. सूर्याच्या ऊर्जेमुळे, व्यक्तीच्या जीवनावर सूर्यकिरणांचा प्रभाव पडतो.

वास्तुशास्त्रानुसार सूर्य रविच्या उत्तरेकडील भागात सकाळी ३ ते दुपारी ३ या वेळेत असतो. सूर्योदयापूर्वी ब्रह्म मुहूर्तापूर्वी सकाळी ३ ते ६ वाजेपर्यंतचा काळ, यावेळी सूर्य पृथ्वीच्या उत्तर–पूर्व भागात स्थित असतो. हा काळ चिंतन आणि अभ्यासासाठी सर्वोत्कृष्ट असतो.

सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत सूर्यप्रकाशाची ऊर्जा पृथ्वीच्या पूर्व (पूर्व) भागात राहते. म्हणूनच घर असे असावे की, यावेळी सूर्यप्रकाशातील प्रकाश आणि शक्ती घरात येऊ शकेल. दक्षिण–पूर्वेस सकाळी ९ पासून दुपारी १२ पर्यंत अन्न शिजविण्याचा हा सर्वोत्तम वेळ आहे. किचन आणि बाथरूम ओले असतात. ते अशा ठिकाणी असावेत जेथे सूर्यप्रकाश चांगला येऊ शकतो.

आरामदायी वेळ (विश्रांती कालावधी) दुपारी १२ पासून ते ३ पर्यंत मानला जातो. सूर्य सध्या दक्षिणेकडे आहे त्यामुळे उर्वरित कक्ष या बाजूला बनविले गेले पाहिजे. दुपारी ३ ते सायंकाळी ६ ही वेळ वाचन आणि काम करण्याची आहे. तेव्हा सूर्य हा नैऋत्येला असतो. म्हणूनच नैऋत्य दिशा अभ्यासाची खोली किंवा वाचनालयासाठी सर्वोत्तम आहे. सायंकाळी ६ ते रात्री ९ ही वेळ भोजन आणि बसणे यासाठी आहे. त्यामुळे घराच्या पाश्मिम कोपरा जेवण किंवा बैठक खोलीसाठी सर्वोत्तम आहे. रात्री ९ ते मध्यरात्री २ पर्यंत घराच्या उत्तर–पश्चिमेला सूर्य येतो. त्यामुळे उत्तर पशचिम ही दिशा बेडरूमसाठी उपयुक्त आहे.

# मुंबईतील एकमेव सूर्य मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दक्षिण मुंबईत असलेला भुलेश्वर परिसर वस्तू खरेदी करणाऱ्यांसाठी अलिबाबाची गुहा आहे. चांगल्यातील चांगली वस्तू कितीही महाग असू दे, भावाची घासाघीस करण्याचे कौशल्य असेल तर अगदी स्वस्तात पदरात पडते. त्यामुळे हा परिसर ग्राहक आणि विक्रेत्यांनी कायम गजबजलेला असतो. भुलेश्वर मार्केटच्या आजूबाजूला कपड्यांसाठी मंगलदास मार्केट, फळभाज्यांसाठी क्राफर्ड मार्केट, दागिन्यांसाठी झवेरी बाझार इत्यादी महत्वाच्या बाजारपेठा आहेत. भुलेश्वरच्या खाऊगल्लीची गोष्टच निराळी आहे. वेगवेगळ्या प्रकारचे अनेक खाद्यपदार्थ या खाऊगल्लीत खवय्यांना खायला मिळतात.

बाजारपेठ असलेला भुलेश्वर परिसर दक्षिण मुंबईचे धार्मिक केंद्रही आहे. मुंबादेवीचे मंदिर, स्वामीनारायण मंदिर आणि इतर सुमारे १०० मंदिरे या परिसरात आहेत. या शंभर मंदिरांत लपले आहे मुंबईतील एकमेव सूर्य मंदिर. सूर्य मंदिराची माहिती करून





घेण्यापूर्वी ज्या पांजरापोळ भागात हे मंदिर आहे त्याची माहिती करून घेऊया.

भुलेश्वर येथे असलेला पांजरापोळ मुंबईतील सगळ्यात मोठा पांजरापोळ आहे. याची स्थापना जमशेटजी जीजीभॉय आणि अमिचंद शाह यांनी १८३४ मध्ये केली. या दोघांना कावसजी पटेल हे सद्गृहस्थ मदत होते. सिपी टॅन्क रोड म्हणजेच कावसजी पटेल टॅन्क रोड. सुरूवातीला फक्त भटके कुत्रे आणि डुकरे यांचा सांभाळ केला जात असे. पण नंतर गाढव, कुत्रे, बकऱ्या, बदके, गायी इत्यादी भटक्या प्राण्यांचाही येथे सांभाळ केला जाऊ लागला. त्याचबरोबर येथे असलेल्या सुमारे ३०० गिर गाईंचे दूध परिसरात विकले जाते. पांजरापोळ येथे भटक्या प्राण्यांची काळजी तहहयात घेतली जाते. पांजरापोळ उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून जीजीभॉय यांनी येथे २०० दुकाने आणि ४५० खोल्या बांधलेल्या आहेत. दुकाने आणि खोल्या यांचे भाडे, रोजची दूध विक्री आणि देणग्यांचा माध्यमातून पांजरापोळचा खर्च भागवला जातो. दुग्धोत्पादन करणाऱ्या सर्व गाईंना नाव आणि टॅगिंग करण्यात आले आहे.

सूर्य मंदिर भुलेश्वरच्या पांजरापोळ गल्ली क्र. ३ येथे आहे. गुजराती व्यापारी हरजीवन वासनजी मणियार यांनी सन १८९९ मध्ये मंदिर बांधले. हरजीवन यांना झालेला त्वचारोग सूर्याच्या कृपेने नष्ट झाला, म्हणून त्यांनी भुलेश्वर येथे सूर्योपासनेसाठी सूर्य मंदिर बांधले. मंदिराच्या कामास सुरूवात झाल्यानंतर थोड्याच काळात हरजीवन यांना देवाज्ञा झाली आणि त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी राधिकाबाई यांनी मंदिराचे काम पूर्ण करून घेतले.

मंदिराच्या बांधकामासाठी लाल रंगाच्या दगडाचा वापर करण्यात आलेला आहे. दर्शनी भागात कमानी, नक्षीकाम आणि ग्रीक शैलीसारखे स्तंभ आहेत. हे मंदिर गुजराथी, मराठी मिश्र शैलीत बांधले आहे. मंदिराच्या शिखरावर विविध देवतांच्या प्रतिमा आहेत. मंदिराच्या आवारात ओवऱ्या आहेत. सभागृहात असलेल्या स्तंभांवर पुस्तक वाचणाऱ्या, योग करणाऱ्या, विविध वाद्य वाजवणाऱ्या इत्यादी विविध मुद्रांत ऋषिमुनी स्थानापन्न आहेत.

गर्भगृहात संगमरवरी दगडापासून बनवलेली आणि पद्मासनात बसलेली रेखीव चतुर्भुज सूर्यमूर्ती आहे. सात घोड्यांच्या रथात सूर्य बसलेला असून रथाचे सारथ्य अरुण करतो आहे. अरुणाच्या हातात घोड्यांचे लगाम आहेत. सूर्याच्या शेजारी स्त्रीदेवतांच्या प्रतिमा आहेत. त्या उषा आणि प्रतिभा या सूर्याच्या दोन भार्या असाव्यात. सूर्याने वरच्या दोन हातात कमलपुष्प धारण केले आहे. सूर्यमूर्ती ज्या अधिष्ठानावर स्थानापन्न आहे, ते अधिष्ठान संगमरवरी असून त्याच्यावर वेलबुट्टीचे नक्षीकाम केलेले आहे.

भुलेश्वर परिसरात फेरफटका मारण्यासाठी गेले तर मुंबईतील या एकमेव सूर्य मंदिराला आणि पांजरापोळला आवर्जून भेट द्या. चर्नीरोड किंवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून भुलेश्वरला जाण्यासाठी बेस्ट बस आणि टॅक्सी मिळतात.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)